# <u>योजनेच्या प्रस्तावित अटी व शर्ती</u>

i. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येईल.

ii. ही योजना जे शेतकरी १ जुलै २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीत बाजार समितीमध्ये कांदा विक्री करतील त्यांचेसाठी लागू राहील.

iii. मुंबई बाजार समिती वगळता राज्यातील इतर सर्व बाजार समित्यांसाठी ही योजना राबविण्यात यावी.

iv. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेखाली अनुदान मिळण्यासाठी कांदा विक्री पट्टीसह, ७/१२ चा उतारा, आपले बँक बचत खाते क्रमांक इ. सह साध्या कागदावर ज्या बाजार समितीकडे कांद्याची विक्री केलेली आहे तेथे अर्ज करावा.

v. परराज्यातून आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्यास ही योजना लागू राहणार नाही.

vi. शेतकऱ्यांना भाव फरकाचे अनुदान प्राप्त करुन देण्याचे प्रस्ताव हे संबंधीत बाजार समितीने तयार करावेत. प्रस्ताव तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी बाजार समितीची राहील. सदरचे प्रस्ताव तालुका सहाय्यक निबंधक यांनी तपासून ते जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे सादर करावेत. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी योग्य प्रस्तावांना मंजूरी दिल्यानंतर ती यादी पणन संचालक महाराष्ट्र राज्य यांना सादर करावी. पणन संचालनालयामार्फत संबंधीत जिल्हा उपनिबंधकांना निधी वितरीत करण्यात येईल.

vii. या योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी संबंधीत बाजार समितीचे सचिव, तालुका सहाय्यक/उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हे या योजनेचे नियंत्रक म्हणून कामकाज पाहतील व त्यासाठी ते जबाबदार राहतील.

******